# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 15.09.2026** **वार : मंगळवार**

---

## ठळक बातम्या

1. ब्रिक्स शिखर परिषद यशस्वी ठरल्याबद्दल परराष्ट्र मंत्र्यांकडून समाधान व्यक्त; अमेरिकी तज्ज्ञांचाही दुजोरा.
2. न्यायव्यवस्थेत निरंतर सुधारणा आणि अधिक पारदर्शकतेची गरज सरन्यायाधीशांनी केली अधोरेखित.
3. 'यूपीआय'द्वारे दोन हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर कोणतंही शुल्क आकारता येणार नाही.
4. विघ्नहर्त्या गणरायाचं सर्वत्र उत्साहात स्वागत.
5. भारत अफगाणिस्तान टी-20 मालिकेतला आज दुसरा सामना.

## सविस्तर बातम्या

### जयशंकर-स्वागत

नवी दिल्ली इथं नुकतीच पार पडलेली ब्रिक्स शिखर परिषद यशस्वी झाल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी समाधान व्यक्त केलं आहे. या परिषदेला बहुतेक सर्वच सदस्य देशांचे राष्ट्रप्रमुख उपस्थित राहिल्याने जगाला भारताच्या प्रबळ संयोजन शक्तीचं यानिमित्ताने दर्शन घडल्याचं ते जयशंकर म्हणाले. दोन मोठे संघर्ष आणि अतिशय ठाम मते असलेल्या, कमालीचं ध्रुवीकरण झालेल्या जगात ही ब्रिक्स शिखर परिषद पार पडली हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे, असं डॉ जयशंकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

### ब्रिक्स-अमेरिका

भारतात नुकतीच झालेली ब्रिक्स देशांची परिषद यशस्वी ठरल्याचं अमेरिकेच्या 'अटलांटिक कौन्सिल'मधील वरिष्ठ अभ्यासक मायकेल कुगलमन यांनी त्यांच्या विश्लेषणपर लेखात म्हटलं आहे. या परिषदेत मंजूर करण्यात आलेला 'नवी दिल्ली जाहीरनामा' हा भिन्न दृष्टिकोन असलेल्या देशांमध्ये एकमत घडवून आणण्याच्या भारताच्या वाढत्या क्षमतेचं द्योतक आहे. विविध देशांना एकत्र आणून जागतिक मंचावर ब्रिक्स देशांना अधिक सामर्थ्यशाली बनवण्यात भारत यशस्वी झाला आहे, तसंच ट्रम्प प्रशासनाच्या व्यापार धोरणांनी घातलेल्या निर्बंधांचा सामना करणाऱ्या अर्थव्यवस्थांसाठी ठोस उपाययोजना करण्याची क्षमता या ब्रिक्स देशांच्या गटात असल्याचंही या विश्लेषणात म्हटलं आहे.

### सरन्यायाधीश

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी न्यायव्यवस्थेत निरंतर सुधारणा आणि अधिक पारदर्शकतेची गरज अधोरेखित करतानाच न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी विकसित केलेली यंत्रणा सक्षम, अत्यंत तत्पर आणि वेळेत कार्यवाही करणारी असल्याचं नमूद केलं. नवी दिल्लीत आयोजित सहाव्या 'राम जेठमलानी स्मृती व्याख्यानमाले'त ते बोलत होते. स्थिर कारभार सुरू असणे ही कोणत्याही संस्थेनं अभिमान बाळगण्याची बाब नसून सुधारणा ही निरंतर प्रक्रिया असायला हवी असंही सरन्यायाधीश म्हणाले. न्यायव्यवस्थेनं स्वतःहून टीकेचे महत्त्व मान्य केले आहे; ही संस्था कधीही टीकेच्या विरोधात नव्हती आणि असूही शकत

नाही, न्यायालयीन कार्यपद्धतीवर माहितीपूर्ण आणि रचनात्मक टीका, हे जिवंत वैधानिक लोकशाहीसाठी अत्यावश्यक वैशिष्ट्य असल्याचंही ते म्हणाले.

**<u>यूपीआय पेमेंट</u>**

UPI द्वारे केलेल्या दोन हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर बँकांना कोणतेही शुल्क आकारता येणार नाही असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. रुपे-समर्थित डेबिट कार्डद्वारे केलेल्या अशा दोन हजार रुपयांच्या आर्थिक देवघेव व्यवहारांवर कोणतंही शुल्क आकारलं जाऊ शकत नसल्याचं सरकारी राजपत्रातील अधिसूचनेत म्हटलं असून या माध्यमातून आर्थिक रक्कम प्राप्त झालेल्या व्यक्तीला कुठलीही बँक किंवा सेवा पुरवठादार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शुल्क आकारू शकत नाही असंही अधिसूचनेत स्पष्ट केलं आहे. 'पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स ॲक्ट, 2007' मध्ये अलीकडेच करण्यात आलेल्या दुरुस्तीवरून उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हा खुलासा करण्यात आला आहे.

**<u>सेमीकॉन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी नवी दिल्लीतील 'यशोभूमी' इथं पाचव्या 'सेमीकॉन इंडिया 2026' परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. यामध्ये 600 हून अधिक प्रदर्शक, 300 आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि 40 हून अधिक देशांतील शिष्टमंडळे सहभागी होणार आहेत. यानिमित्त भरवण्यात येणाऱ्या प्रदर्शनात सहा देशांची दालनं, बारा राज्य सरकारांची दालनं आणि स्टार्टअप्ससाठी एका विशेष दालनाचा समावेश असेल. ‘इंडिया सेमीकंडक्टर मिशन', 'इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय' तसंच 'SEMI' यांनी आयोजित केलेली परिषद तीन दिवस चालणार आहे.

**<u>एस. जयशंकर-व्हिएतनाम</u>**

व्हिएतनाम हा भारताचं 'ॲक्ट ईस्ट धोरण' आणि 'व्हिजन महासागर' तसंच 'हिंद-प्रशांत-पॅसिफिक' क्षेत्राबाबतच्या दृष्टिकोन या सर्वातील एक महत्त्वाचा भागीदार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. व्यापार, अर्थव्यवस्था, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्यासाठीच्या भारत-व्हिएतनाम संयुक्त आयोगाची डॉ. जयशंकर यांच्या सह-अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत 19वी बैठक झाली. त्यामध्ये बोलताना जयशंकर यांनी आसियान गटासोबतच्या सर्वंकष धोरणात्मक भागीदारीच्या चौकटीतही व्हिएतनाम हा महत्त्वाचा भागीदार असल्याचं सांगितलं. तीन वर्षांपूर्वी झालेल्या या संयुक्त आयोगाच्या बैठकीनंतर भारत आणि व्हिएतनाम द्विपक्षीय संबंधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>गणेश चतुर्थी</u>**

गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात, विघ्नहर्त्या गणेशाचं, काल राज्यासह देश परदेशात उत्साहात, जल्लोषात आगमन झालं. श्री गणेश प्रतिष्ठापनेनं अनंत चतुर्दशीपर्यंत बारा दिवस चालणाऱ्या उत्सवाची उत्साहात सुरुवात झाली. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या लोककला आणि सांस्कृतिक परंपरेचा देश-विदेशात जागर होणार आहे. महाराष्ट्राचं सांस्कृतिक कार्य संचालनालय 36 जिल्ह्यांसह विविध राज्यं, नवी दिल्ली आणि दुबईत 'लोककलेतील श्रीगणेश' हा उपक्रम राबवणार आहे.

देहरादून, जम्मू, चेन्नई, सिल्वासा, लखनऊ, कोटा, अमरावती, कोलकाता आणि हैदराबाद या ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमात नमन, लेझीम, धनगरी, कोळी, आदिवासी नृत्य, मंगळागौर, गोंधळ आदी लोककलांचं सादरीकरण होईल. नवी दिल्लीत नाटक, चित्रपटगीतं आणि लावणी, तर 26 सप्टेंबरला दुबईत महाराष्ट्राच्या लोकपरंपरांचा जागर होणार आहे. मुंबईत 17 ते 24 सप्टेंबरदरम्यान शास्त्रीय संगीत महोत्सवही आयोजित केला आहे.

**एफआयआर**

दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं एफआयआर दाखल करून घेतला आहे. दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर होती. 8 जून 2020 रोजी इमारतीच्या 12व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एफआयआर दाखल करायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले होते. त्यानुसार, हा एफआयआर काल दाखल झाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, पोलीस अधिकारी सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतर अनेक जणांचा उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

**अमेरिका-सुप्रीम कोर्ट**

अमेरिकेत नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांपूर्वी टपालाद्वारे मतदान करण्यास बंदी घालण्याची अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची योजना तिथल्या  सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. टपाल विभागाला टपालाद्वारे पाठवण्यात येणाऱ्या मतपत्रिकांसंबंधीचे नवीन नियम लागू करण्यास तात्पुरतं रोखण्याबाबतचा एका संघराज्याच्या न्यायाधीशांनी दिलेला आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी कायम ठेवला आहे.

**अमेरिका-इराण**

होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ, ओमानच्या किनाऱ्यालगत पनामाच्या तेलवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यावरून परस्परांना दोषी ठरवत अमेरिका आणि इराण यांच्यात वाद सुरू आहे. इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्डच्या निवेदनानुसार त्यांच्या मते सामुद्रधुनीच्या दक्षिणेकडील प्रतिबंधित असलेल्या भागातून हे जहाज जाण्याच्या प्रयत्नात असताना ते समुद्री सुरुंगावर आदळल्यानं त्यानं पेट घेतल्याचं इराणच्या प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या बातम्यांमध्ये म्हटलं आहे. मात्र अमेरिकेनं आयआरजीसीचा हा दावा खोडून काढला आहे.

**हुती**

येमेनमधील हुती बंडखोरांनी काल पुन्हा सौदी अरेबियावर जोरदार हल्ले चढवले. या बंडखोरांना इराणचा पाठिंबा आहे. हे हल्ले सौदी अरेबियाच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर असल्याचं सांगत येमेनकडून या हल्ल्यांचं समर्थन करण्यात आलं आहे. क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या या हल्ल्यांमध्ये सौदी अरेबियाच्या दक्षिण भागातील विमानतळ, रस्ते आणि शस्त्र साठयांना लक्ष्य करण्यात आलं.

**नेपाळ**

भारताने पूरग्रस्त नेपाळला 31 डिसेंबरपर्यंत 18 तास वीज पुरवठा करण्यास मंजुरी दिली आहे. ऊर्जा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मुझफ्फरपूर-ढालकेबार वाहिनीद्वारे 600 मेगावॅट आणि टनकपूर-महेंद्रनगर वाहिनीद्वारे 54 मेगावॅट वीज निर्यातीस ही मंजुरी देण्यात आली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि अफगाणिस्थान यांच्यात टी-20 क्रिकेट मालिकेतील दूसरा सामना आज नवी दिल्ली इथं खेळला जाणार आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत भारत 1-0 नं आघाडीवर आहे.

याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

नमस्कार.